**नियमित दिवाणी कज्जा क्र.१४५/२०२२ मधील नि.क्र.११ वरील आदेश**

( पारीत दिनांक – २४/०२/२०२३)

सौ. संगीता राहूल अवघडे विरुध्द श्री. सचिन सिध्दू केंगारे वगैरे,०२

**CNR -MHKO130011732022**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, सदर कैफियत दाखल करणेसाठी ३९ दिवसांचा विलंब झालेला आहे तरी यातील कैफियतीचा विलंब माफ व्हावा व सदरची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी प्रतिवादीची विनंती आहे.

३. सदर अर्जावरती खालील बाजूस वादीने त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व प्रस्तुत अर्जामध्ये विलंब कोणत्या कारणाने झाला ते नमुद केलेले नाही. अर्जास कारण नसलेने तो नामंजूर होणेस पात्र आहे. सदर कामी सी.पी.सी. मधील तरतुदीनुसार अर्ज दाखल केलेला नाही. सदर अर्जास प्रतिवादी यांची प्रतिज्ञा, ॲफिडेव्हीट केलेले नाही. निव्वळ वेळ काढणेकरीता सदर अर्ज दाखल केला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी वादीची विनंती आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी अभिलेखाचे अवलोकन करता, कैफियत दाखल करण्यास कायदयाने निश्चित केलेला कालावधी उलटून गेला आहे असे दिसून येते. त्यानंतर, दि. २४/०२/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे असे दिसून येते. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, प्रतिवादी यांना कैफियत मांडण्याची संधी देणे योग्य राहील, तसे न केल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. तसेच, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे ही न्यायाच्या दृष्टीने योग्य राहणार आहे. सदरच्या अर्जामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादी यांच्यावर बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ११) प्रतिवादीने वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही

खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेण्यात येते.

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.02.24 17:39:03 +0530

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – २४/०२/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.